रा. रा. दत्तात्रय वासुदेव जोगळेकरकृत

हास्यरस मालिका.

पुस्तक १ लें.

वरणभाताचें प्रहसन.

अर्थात्

विजोडयाचा मनोरंजक फार्स.

ही मालिका सुजन मानस रंजवाया,
म्या गुंफिली परि न हेतु मुळींच वाया;
लोकांत हो प्रबल अंध परंपराती,
शोकाब्धिमाजिं बुडवी बहुतां अहो ती ॥ १ ॥

हें पुस्तक.

गोविंद मोरोबा कार्लेकर

यांनीं मुंबईमध्यें.

" जगदीश्वर " छापखान्यांत छापविलें.

आवृत्ति २ री.

शके १८१३ सन १८९१

[redacted]

प्रस्तावना.

—:०:—

चमत्कारिक इच्छा आणि अंधपरंपरा या दोन गोष्टीं-मुळें आजपर्यंत आपले किती लोक दुःखी झाले आहेत ? याचा अंतही लागणार नाहीं. आईबाप मुलांची लहान-पणीं लग्नें करून आपली हौस पुरवून घेतात आणि तीं मुलें वयांत आल्यावर विचारांत पडतात व वडिलोपार्जित कीर्ति आणि अब्रू गमावून बसतात. या गोष्टीचें हें एक चित्र आहे.

जरी याचा मुख्य हेतु लोक मनरंजनाचा आहे, तरी अविचाराचा परिणाम काय होतो, हें स्पष्ट दाखवून लोक-निंदित व परिणामीं संकटांत फसविणारीं कृत्यें कोणती ? हें ध्वनितार्थानें प्रगट होत आहे. हें सूज्ञ वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं

या अत्यल्प पुस्तकांत दोषांचाच भरणा फार आहे, तरी हेतु उपदेशार्ह असल्यामुळें कोणाही सुविचाऱ्यास शंका येईल असें वाटत नाहीं. ह्मणून सूज्ञ वाचकांनीं गुणलेशाचा अंगिकार करावा अशी सविनय प्रार्थना आहे.

प्रहसनकार.

पात्रें.

बचंभट—एक वयोवृद्ध गृहस्थ.

बया बाई—त्याची पत्नी.

बाळ्या—त्याचा पुत्र. (मोठ्या बायकोचा लहान नवरा.)

ठकू—बाळ्याची स्त्री. (लाहान पतीची मोठी बायको.)

गोविंदबुवा—ढोंगी साधु (जार).

गडी, कुळंबीण, पोरें, शेजारणी वगैरे.

वरणभाताचें प्रहसन.
अर्थात्
विजोडयाचा मनोरंजक फार्स.

प्रवेश १ ला.

[बचंभट, बयाबाई आणि बाळ्या.]

(सोनगांव येथील बचंभटाचें घर.)

[हातांत पत्र घेऊन विचार करीत करीत बचंभट येतो.]

बचंभट—आतां काय इथें डोचकें फोडावें ? पोराकडे पाहिलं तर त्याला कांहीं कळत नाहीं. दिवसांदिवस जसा जमिनींत चालला आहे, (अशक्त—खुजा होत आहे.) आणि ती सणसणीत हाडाची पोरगी आली उफाळ्याला (पत्रास उद्देशून) तिला ह्मणे ऋतु प्राप्त झाला ! "सोहाळ्यासाठीं थोडक्याच दिवसांत रवानगी करतों." कशाला कपाळाला रवानगी करतों ? इथें काय आहे ?

आतां माझ्या नशीबाचा आणि नांव लौकिकाचा सोहाळा व्हावयाचा आहे; तो ती इकडे आली ह्मणजे झालाच सुरू! बेव्याला तालमींत घालून खुराक लावला; तर आपला तिसऱ्या दिवशीं ×गायाला लागला आणि अजीर्णामुळें तापांतही पडला. त्यामुळें तोंडावर थोडकासा नूर होता तोही नाहींसा झाला. "रामा शिवा गोविंदा" बोलायाला नको आणि चालायालाही नको. (पडद्याकडे पाहून) अग, ए आहेसकां घरांत ?

बयाबाई–(आंतून) कांबरं ? आहें.

बचं०–काय करतेस काय ? अशी ओटीवर ये पाहूं.

बया०–(आंतून) मी आपल्या बाळ्याला थोपटून निजविल्याशिवाय येत नाहीं.

बचं०–(कपाळावर हात मारून) हें फुटकें नशीब माझेंच, नाहीं ? बाळ्याच्या बायकोला न्हाण आलें तरी अजून त्याला थोपटून निजवित्ये आहे ! (पडद्याकडे) अगए, त्या कव्र्यालाही घेऊन पहिल्यानें तूं बाहेर ये.

बया०–(बाळ्याला हातांत धरून बाहेर येते.) आज फारसं तोंड सुटलं आहे ? साठा वर्सांनीं सुंठ फुलली, तेव्हां देवानं नवानवसाचं मूल दाखविलं. त्याचं चोज करणें तें नाहींच. नी कव्र्या, कव्र्या ह्मणाचं का ?

बचं०—अग सठवे, हें पाहिलेंस ? (पत्र दाखवितो.) त्याच्या बायकोला न्हाण आलं. तरी तूं त्याला थोपटून निजवितेस, ह्मणजे हें आहे तरी काय ?

बया०—(आश्चर्यानें) अग बाई ! खरंच का मुलीला न्हाण आलं ! ! कधीं बाईतें ?

बचं०—हें पहा. (पत्र दाखवीत पुढें होतो.)

बया०—(मुलास) बाळ्या, ऐकलंसनां आतां ? तुझ्या बायकोला न्हाण आलं ? तूं हुशार आहेस नां ?

बाळ्या—हो. हो.

बया०—झालं तर (बचंभटास) मग ? आतां नाहीं का सांगाचं कधीं न्हाण आलंतें ?

बचं०—(पत्र दाखवून) हें पाहिलेंस ? पौष वद्य अष्टमी, मंगळवारीं प्रातःकालीं ! !

बया०—बरं आणखी काय लिहिलं आहे ?

बचं०—तुझं आणि माझं नशीब.

बया०—रागावणं कशाला ? व्हायचंतें होईल.

बचं०—तुझें डोंबल होईल आतां ! अग शिकव आतां त्या पोराला कांहींतरीं.

बया०—मी त्याला सगळं शिकवून ठेवलं आहे. काळजी कराला नलगे. काय आहे तें सांगावं मात्र.

बचं०–(पत्र दाखवून) हें पाहिलेंस ? "मुलगीचा सोहाळा लौकरच व्हावा; असं आमच्या सगळयांच्या मनांत आहे. यास्तव पत्र देखत तिला नेण्याकरितां घोडें व ब्राह्मण आणि कुळंबीण पाठवावी व सोहाळ्याचा मुहूर्तही नेमून कळवावा, ह्मणजे रितीप्रमाणें मानपानाची व देण्याघेण्याची तजवीज,ठेवण्यास जड जाणार नाहीं." ऐकलेंस ?

बया०–हो ऐकलं. बेश आहे. घरांतला ब्राह्मणच रमीला बरोबर देऊन त्या काळ्या घोडी बरोबर सुडक्या गड्याला धाडावं, ह्मणजे झाले. इतकीं माणसें गेली ह्मणजे तिला कशी फुलासारखी आणतील.

बचं०–अगपण ×ढवी, हा पोर दिवसांदिवस क्षयरोगी होत चालला; त्याचा कांहीं विचार करशीलकीं नाहीं ?

बया०–त्याला सगळं ठाऊक आहे. (मुलास) बाळ बायकोला आपल्या धाकांत ठेवशील ना ?

बा०–हो; ठेवीन तर ?

बया०–(बचंभटास) पाहिलं कसं गुणाचं बाळ आहे तें ! (मुलास) ऐकलंस नारे ? बायकोकडे डोळे वटारून पहावं; पाय धुवायाला पाणी मागावं; नी तिला आपल्या धाकांत ठेवावी. करशील नां असं ?

बा०–होय करीन.

बया०—झालं तर. आपण बेलाशक माणसें पाठवून तिला आणावं नी मग बाळ्या तिला कशी वागवीतो तें पहावं. चलरे बाळ, तूं थोडा फराळ कर. (बाळ्या व बयाबाई जातात)

बचं०—मला कांहीं या पोराचें लक्षण नीट दिसत नाहीं. सुनेला आणून अगदीं अर्थ नाहीं. (विचार करून) पण नच आणली तर व्याही कारण विचारतील, त्यांना काय सांगावें ? (कांहीं थांबून आठवलेंसें करून) मुलगा तालमींत जात असतो, ह्मणून सांगावें ह्मणजे कांहीं दिवस तरी लोटतील. (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थल—धामणी गांवांबाहेरील मारुतीचें देवालय.

ठकू आणि गोविंद बुवा.

(पडदा उघडतांच ठकू येऊन देवदर्शन घेते व प्रदक्षणा घालूं लागते.)

ठकू—अजूनपर्यंत स्वारी येत नाहीं हें आहे तरी काय ? दहा घटका वर दिवस आला; आतां मला इथें कसें रडविलं ? आणि कदाचित् राहिलेंच तर नेम काय ?

तितक्यांत कोणी परकं माणूस येऊन बसलं, कीं मग सगळं फसलं ! (मारुती पुढें येऊन) देवा मारुतिराया, मी तुझी आहे. माझा आशाभंग करूं नको.

गोविंदबुवा-(एकाएकीं येऊन) देवा मारुतिराया, तू अशा सोदेपणाच्या नवसाला न पावशील, तर तुला कोणी सोदा मारुती ह्मणेल असें मनांत आणू नको. (ठकूस) आज फारशा विनंत्या चालल्या होत्या ? कांहीं अधिक उणं आहे वाटतं ?

ठकु-अधिकउणं तें काय असणार ? रोजचं तेंच आहे. मात्र मला सासरचं बोलावणं आलं आहे. ह्मणून ह्मणतें कीं, आतां ही शेवटचीच भेट. (त्याच्या गळ्यास मिठी मारून दुःखित होते.)

गोविं०-(तिच्या तोंडावरून हात फिरवितो आणि दुःखित होतो.) खरोखरीच मोठ्या दुःखाची गोष्ट आहे, आतां काय करावं आणि या माशुक पात्राशिवाय काळ कसा काढावा ? असो, आमचेंच दुर्दैव ह्मणून रडत बसावं असचनां ?

ठ०-तुह्मीं पुरुषच जर असं बोलूं लागलेत, तर आह्मी बायकांनीं काय करावं ?

गोविं०-तसं नव्हे, पण घटकाभर असें समज कीं,

मी तुझ्या सासरीं निघून आलों आणि तुझी भेट घेतली; तरी सदोदित धाकांतच रहायाचें ना ?

ठ०—आपण जर तिथे येऊन माझी भेट घ्याल, तर सवड पाहून आपल्याला ज्या ठिकाणीं धाक बाळगावा लागणार नाहीं, अशा ठिकाणीं तुमच्या बरोबर निघून यायलाही कमी करणार नाहीं.

गोविं०—असें जर खरें असेल तर दुःखित होण्याचें कारण नाहीं व ही आपली शेवटची भेट हेंही ह्मणणें निरर्थक आहे.

ठ०—पण मी आज संध्याकाळीं निघणार.

गोविं०—तूं संध्याकाळीं निघणार तर आह्मी आपल्या चिपळ्या आणि तंबुरा व पडशी खांद्यांवर टाकून याच वेळेस प्रस्थान करणार.

ठ०— हें खरेंना पण ?

गोविं०—हें काय विचारणें ? (तिच्या गळ्याला हात लावून) या जिवासाठीं कांहीं झालें तरी तें आपल्याला कबूल आहे. असें प्रेम आहे कोठें ? चला तर उशीर झाला.

(चुंबन घेतो व जातो. नंतर ठकूही जाते.)

प्रवेश ३ रा.

स्थल-सोनगांव, बचंभटाचें घर.

पात्रें-बचंभट, बयाबाई, बाळ्या, आणि मागून ठकू कुळंबीण, गडी वगैरे.

(बयाबाई आणि बाळ्या येतात.)

बयाबाई-अरे पण तुला अजून इतकं सुद्धांकां कळत नाहीं? वेडारे वेडा!! बाळ्या बायको ह्मणजे केवळ एक बटकूर, असं असतां "तिला पाहतांच मला भय वाटेल" असें ह्मणतोस, यांतरे अर्थ काय?

बाळ्या-अग आई, लोकांचीं पोरें, ह्मणजे माझे खेळ गडी ह्मणतात कीं, ती माझ्याहून फारच मोठी आहे. तर मग तूंच सांग बरं, मी जर तिला कांहीं बोललों; तर ती मला मारणार नाहीं?

बया०-हा मेल्या, ती तुला मारील कायरे? मेला अवचट कोठला, भलभलतंच कांहीं बोलतो. अरे बायको जवळ गोडगोड गोष्टी बोलाव्या, तिला आपल्या धाकांत ठेवावी, निजायाच्या वेळीं तिच्याकडून पायांना तूप लावून घ्यावं, नी कसं-अगदीं-

बचंभट-(ऐकत ऐकत येतो.) भले शाबास! शिकीव, असें कांहीं जर शिकविशील, तर निभाव लागेल.

बा०—आईग, किनाई, मी किनई आपला तुझ्या ज-वळ निजेन.

बचं०— हा मूर्खा! असें बोलावें तरी?

बा०— तर मग एवढी मोठी बायको मला कशालारे?

बचं०— खरें आहे बाबा. आह्मीच पहिल्यानें चुकलों आणि आतां विचारांत पडलों आहों. तरी पण बाळ, आतां आमची अब्रू संभाळणें तुजकडे आहे. आतां तुझ्या बायकोला न्हाण आलें.

बा०— बाबा, एबाबा, बाबा, न्हाण ह्मणजे कायरे?

बचं— (बायकोस) ऐकलेंस का पोर काय विचारतो तें?

बया०— नुस्तं असं विचारलं ह्मणून काय झालं?

बचं०— झालें काय ह्मणतेस? (रागानें) पोराचे गूण ठाऊक असतांना माझ्या मताशिवाय तूं सुनेला आणायला कां पाठविलेंस?

बया०— कांहीं चिंता नाहीं. तो असं बोलला तरी मी त्याला कसा तरबेज करून सोडीन, आपल्याला काळजी नको.

बचं०— बरें आहे. पाहीन, आतां घोडा मैदान नजीक आहे.

बया०— असूंदे. हत्तीला अंकुश कांहीं मोठा लागत नसतो.

(इतक्यांत एक कुळंबीण येते.)

कुळंबीण— बयाबाय उटानं, तुमच्या सुनबाई आल्याती. मी कळवाया फुड आल्यें.

बया— अगबाई! खरंचकां आली? कुठे आहे ती?

बचं— (दाराकडे पाहून) अग, ही पहा आली ऊठ तिच्या वरून एवढी भाताची उंडी ओंवाळून टाकायला सांग, आणि पाय धुऊन मग आंत येऊंदे.

बया०— (कुळंबीणीस) अग, ऐकलंसकां? चल मी भात देतें तो सुने वरून ओंवाळून टाक.


कुळं०— जी. चलाकी तर. (दोघी आंत जातात.)

बचं०— बाळ्या तुझी बायको आली!

बाळ्या— बाबा, ही बायको मला नको;

बचं०— हा ×ढवा, असें कोणी बोलतो? आतां घरांत तुझी बायको असणार, तर तिच्या देखत पोरकट चाळे करशील ते कामाचे नाहींत. असे (चालून दाखवितो) ऐटीनें चालावें; मोठ्या गंभीरपणानें बोलावें, मिशीवरून वरचेवर हात फिरवावा—

बा०— अरे पण मिशी आहेच कोठें?



चि. फा.

बचं०— नसली ह्मणून काय झालें ?

(बयाबाई सुनेला घेऊन येते.)

ठकू— (सासऱ्याला व पतीला नमस्कार करून खालीं पहात उभी राहते.)

बा०— (बायकोनें नमस्कार करितांच तिला साष्टांग नमस्कार घालतो.)

ठ०— (नवऱ्याचें अज्ञान पाहून गालांत हंसते)

बचं०— (आपल्याशीं) अरे बापरे! हें तर अगदीं तरतरीत प्रकर्ण आहे. हें खुजें पोर ही शिकार कशी मारील नकळे. (उघड सुनेस) आपाभटजी खुशाल आहेत नां ?

ठ०— (मानेनें होय असें ह्मणते.)

बचं०— आणि तुझी आई, मुलें, बाळें !

ठ०— सगळीं खुशाल आहेत.

बया०—(बचंभटास) साळू बाईनीं किनई, सगळ्यांना विचारलं आहे हो.

बचं०— बरें आहे. कांहीं पत्रबित्र ?

ठ०— (एक पत्र पुढें टाकते.)

बचं०— (बराच वेळ पत्र वाचलेसें करून) ठीक आहे. आह्मांला सर्व समजतेंच आहे, (बयाबाईस) अग, आज नव्या नवसाची सून घरांत आली आहे, ह्मणून कांहीं गोडधड कर बरें.

बया०– बरें आहे. मला तें समजतं आहे. (सुनेस) चलगो मुली घरांत. आपल्याला इथं पुरुषांत बसण्याचें काम नाहीं.

(दोघी जातात.)

बचं०–बाळ्या, ×ढवा! बायकोनें तुला नमस्कार करतांच तूं तिला साष्टांग नमस्कार काय ह्मणून घातलास?

बा०– अरे बाबा, आपण एकमेकांला कसे उभ्यानें असे असे (नमस्कार करून) नमस्कार करतों. हें तूंचना मला दाखविलेंस ?

बचं०– बरें मग?

बाळ्या– मग काय? तिनें मला (वांकून नमस्कार करून) असा असा वांकून नमस्कार केला ह्मणून मी तिला साष्टांग नमस्कार घातला. मग त्यांत काय झालें?

बचं०– अरे पण ती तुला हंसलीना ?

बा०– ती मला हंसली? मी तिला हंसेन.

बचं०– हाच तो पोरकटपणा. बाळ्या, तुला किती शिकवावें? ×ढवा, आतां ही लंगोटी घालणें सोडूनदे आणि घरांतलीं तीं नागपुरी धोतरें नेसत जा. आंगांत आंगरखे बंड्या वगैरे घालून कसें छानदार दिसावें. तुझी बायको कशी दिसते हें पहात नाहींस? एव्हांशींच कांहीं मी गर्भा

दानाचा बेत करीत नाहीं. तरी रात्रीं हळूच आमच्या न-कळत बायको जवळ × जायाला जावें समजलास ?

बा०— अंहं: मी आपला आई जवळच निजत जाईन.

बचं— हा × ढवा, मूर्ख बेटा. बैला, असें बोलतोस ?

बा०— तर कसें बोलूं बाबा?

बचं०— नीट बोलावें. पोरासारखे चाळे करूं नयेत, ह्मणजे झालें. पहा जर मी सांगतों याप्रमाणें वागशील तर तूं मागशील तें तुला देईन आणि सांगशील तें ऐकेन.

बाळ्या०— बाबा खचितरे? खचित ?

बचं०— होय. खचित.

बा०— तरमग आतां मी खेळायला जातों.

बचं० जा, पण फार दूर जाऊं नको. आमची हाक पोंचेल इतक्या अंतरावर जाऊन खेळ पाहिजे तर.

(कांहीं थांबून) बरें पण काय खेळशील आतां ?

बा०— भातकुली ! !

बचं०— हा मूर्खा (त्याला मारायाला जातो.)

बा०—(पळून जातो.)

बचं०— काय करावें आतां या कर्म भोगाला ! पोरगा पाहिला, तर असा [illegible]बुळा, आणि सून चालली आहे फोंफावत. जर मी बायकोच्या बुद्धीनें वागलों नसतों तर

अशा पंचायतींत आलों नसतों. ही विनाकारण फजिती होण्याची वेळ आहे. परमेश्वर काय अब्रू सांभाळील ती खरी. आतां जरी एव्हांशीं वर्षभर गर्भाधान करूं नये असें ह्मटलें, तरी तें लोकांत वाईट दिसणार, आणि शिवाय बायको रोज फुगलेली असणार तें निराळेंच. (कांहीं थांबून) बस्स, कांहीं असो. एव्हांशीं कांहीं ऋतुशांतीचा सोहाळा करायाचा नाहीं.

(बयाबाई येते.)

बया०— कां ? कसला विचार चालला आहे ?

बचं०— विचार दुसरा कसला चालणार ? आपण आपल्या सुनबाईला जवळ आणून बसलांतना ?

बया०— मग ? काय झालें ? ती कशी चखोट आहे पाहिली नाहीं वाटतें, अजून ? कशी अगदीं हिरकणी !

बचं०— बरें आहे आवडलीनां तुला ?

बया०— हें काय विचारणं ? आवडलीच आहे. पण आतां तिचा सोहाळा कधीं करायाचा ?

बचं०— सोहाळ्याची कांहीं एव्हांशीं गरज नाहीं.

बया०—तससं कांहीं कामाचं नाहीं सांगतें आहे. न्हातीधुती सोळा वर्सांची पोर सोहाळ्या शिवाय जर ठेविली तर लोकांत बायका मला तोंड नाहीं बाहेर काढूं देणार.

बचं०– अग पण सठवे, ज्याच्यासाठीं तिचा सोहाळा करायाचा, त्याच्या विषयीं कांहीं विचार करशील कीं नाहीं?

बया०– त्याच्या विषयीं कसला विचार? मला तें कांहीं समजत नाहीं. सुनेचा सोहाळा लौकरच झाला पाहिजे.

बचं०– या बाबतींत मी तुझें ऐकणार नाहीं.

बया०– मी सोहाळा करविल्या वाचून राहणार नाहीं. माझ्या पोरा बद्दलची खात्री मला आहे.

बचं०– ठीक आहे तुह्माला आवडेल तसें करा.

बया०–असें बोलल्यावर कोणी कांहीं ह्मणेल. आतां चलावं जेवायाला, उशीर झाला. (दोघें जातात)

प्रवेश ४ था.

स्थल–सोनगांवांतील महादेवाचें देवालय.

पात्रें.

गोविंद बुवा, बाळ्या आणि त्याचे खेळगडी.

(बाळ्या व पोरें खेळत आहेत तों गोविंदबुवा भजन करीत येतो.)

गोविंदबुवा– पद.

गोविंद गोविंद, गोपाल राधे, कृष्ण गोविंदगो० ॥

॥ धृ० ॥ स्मरतां भवभय नाशी, करितो भक्तजन-प्रतिपाल ॥ राधेकृ० ॥ १ ॥

काय करावें आतां, या गावांत येऊन आठ दिवस झाले; तरी कांहीं लाग लागत नाहीं आणि ती तर दृष्टीसही पडत नाहीं, अतीशय मेहनत करून फिरत असतां काल तिच्या दुधखुळ्या नवऱ्याबद्दल सुगावा लागला आहे. तरी त्या वर विश्वास ठेवतां येत नाहीं. " धिप्पाड बायकोचा स्वप्पड दादला." ह्मणून पोरांनीं चेष्टा केली आणि तिनें सांगितल्याप्रमाणें त्याचीं लक्षणेंही मिळालीं ह्मणून आशा बाळगण्याचें कारण. (कांहीं थांबून) कांहीं असो. पहिल्यानें या पोराला नादीं लावून याच्या घरीं प्रवेश होईल असें करावें. भजनाचा सपाटा लांवून ताना माराव्या, ह्मणजे पोरें आपोआप येतील.

पद.—गोविंद, राधे गोविंद, जयजयगोपाल
राधे गोविंद ॥ गोपाल राधे गो०॥धृ०॥
कुंजवनीं जो विहार करुनीं, रासोत्सावें
हो॥तुंद ॥ जयजय गो०॥१॥ गोपीजन
मनहरण करूनी, लावि तयां निज छंद॥
ज० ॥२॥ तन्नामस्मरणास करूनी, दत्त
करी बहु फंद ॥ज०॥ ३॥



चि. फा.

(या प्रमाणें गात व नाचत असतां पोरें येऊन त्याचे सभों-
वतीं उभीं राहतात.)

एक पोर–(बाळचास) ए, बुवा कसा नाचतो ?

दुसरा–गातोही छान्दार.

बाळ्या–आपल्याला तर हा बुवा आवडला !!!

तिसरा–अवडाला तर घे; त्याला आपल्या घरीं घेऊन जा.

बा०–हो हो, नेईन. मग काय ह्मणतोस ?

पहि०–ह्मणायाचें काय? त्याला घरीं नेऊन त्याची सग-
ळी सोय करशील तरच तूं खरा. नाहींतर आतां आह्मी
सगळे मिळून तुझ्या ×डी वर कोळशाची रेघ ओढूं.

गोविंद बु०–(पोराचें बोलणें ऐकून आपल्याशीं) परमेश्वर
तरीं या बाबतींत मला साह्य होत आहे असें वाटतें. आ-
तां यांचें भांडण मिटवून आपलें काम करून घ्यावें. (उघड)
बाबानों, भांडतां कां ?

पहि०–अहो, (बाळचाला दाखवून) याला तुह्मीं आव-
डलेत. तेव्हां आह्मीं त्याला ह्मणतों कीं, तूं त्यांना घरीं
घेऊन जा.

गोविं०–अंः त्यांत काय आहे? अरे आह्मां साधू लोकानां
कोणाच्या घरीं जाणेंच योग्य नाहीं. यासाठीं तुह्मी भां-
डूं नका.

दु०– अहो जा. तुमची चैन होईल !

गोविं०—नको नको. घर ह्मटलें ह्मणजे तेथें बायका असणारच आणि त्यांचा तर आह्मांला विटाळ.

बा०– तें कांहीं असो बुवासाहेब आपणयाचठिकाणीं क्षणभर बसा मी घरीं जाऊन बाबाला विचारून येतों.(जातो)

सर्वपोरें– हुर्यो!हुर्यो!! धिप्पाड बायकोचा खप्पड दादला! हुर्यो ! ! हुर्यो ! ! ! (असें ह्मणत त्याच्या मागून जातात)

गोविंद०—तोचरे तोच. बहुधा आपला कार्य भाग झाला ! ! आतां ढोंग मात्र पक्कें ठेऊन देवतार्चन व भजन वाढविलें पाहिजे. (जातो.)


प्रवेश ५ वा.

बचंभटाच्या वरच्या बाजूचा सोपा.

(गोविंदबुवा पूजा करून ध्यान करीत बसले असतां एकांत पाहून ठकू येते.)

ठकू–(बुवास पाहून थट्टेनें) हें असं बकध्यान लावून लोकांना ठकविणारेच बुवा मेले आलीकडे जिकडे तिकडे झाले आहेत.

गोविंद०–(ठकूचा शब्द ऐकतांच डोळे उघडून.) या, या; आटपलें आमचें ध्यान. ज्या देवतेचें ध्यान


ठकू.
गोविंदबुवा
वि. फ.

करावयाचें, तीच जर प्रसन्न होऊन पुढें येऊन उभी राहिली; तर ध्यान कशाला धरावें? (उठून) आलिंगनच करावें ह्मणजे झालें. (तसें करितो.)

ठकू–(लाजून) अगबाई! हें काय? कोणी येईल एखादें—

गो०–(तिला सोडून) येईना? हे आह्मी बाजूला झालों. बरें कसें काय? आज तुमचा सोहाळा आहेना? ह्मणूनच हा थाट झाला आहे!! कराबुवाचैन!! ए, पण त्या पोराबरोबर तूं काय करशील?

ठकू०–इश्श, हें काय विचारणं?

गोविं०–कोणी झालें तरी खरें बोलावं.

ठकू०–पण मजपाशीं नाहीं तसं चालणार. बरं, आतां मी जातें. बहुतकरून आजचा दिवस कांहीं भेट होणार नाहीं.

गो०–भेट होणार नाहीं तर आह्मीं काय करावें?

ठ०–खावं, प्यावं, नी मौज करीत बसावं.

गो०–बरेंआहे. उद्यां काय होईल तें कळवा. बहुधा मौज होईल.

ठकू०–बरं आहे. चावट नाहींतर. (जाते.)

गोविं०–परमेश्वरा, तुझीच ही सर्व लीला आहे. नाहीं

तर त्या पोरांनीं थट्टा केल्यावरून बाळ्याच्या मनांत मला घरीं घेऊन येण्याबद्दलची ईर्षा उत्पन्न व्हावी, नंतर त्यानें बापाजवळ हट्ट धरून मला घरीं आणून ठेवावें आणि आपल्या प्रियेची गांठ पडावी. येथें सर्वस्वी सौख्य आहे. तरी लौकरच तिला घेऊन निघून गेलें पाहिजे. चला आतां देव दर्शनाला जावें. (जातो.)

प्रवेश ६ वा.

ठकू करितां तयार केलेला रंगमहाल.

ठकू, बाळ्या, बचंभट, बयाबाई (आई) कांहीं बायका.

(छप्परपलंग तयार केलेला असतां बाळ्या येतो.)

बाळ्या—(आरास पाहून) अरे बापरे, काय हा लखलखाट ! ! कीं अगदीं आग लावून दिल्या सारखें केलें आहे. आईनें सांगितलें आहे कीं जाऊन पलंगावर नीज, ह्मणजे बायको येऊन तुझ्या पायांला लावील, तिला कुशींत घे. (कांहीं थांबून) आपण नाहींरे बुवा तिच्या अंगाला हात लावणार ! ! केवढी मोठी धिप्पाड ती ! तिला मी कुशींत कसें घ्यावें? (जांभई देऊन) झोंप येऊं लागली. पलंगावर निजावें ? (थांबून) नको. बायको आली तर मारील. मी आपला खालींच निजतों. मग ती



वि. फा

येईना बापडी. पलंगाच्या बाजूस भुईवर पडतो व झोंपी जातो.)

(अलंकार भूषणांनीं नटलेली ठकू येते.)

ठकू०—जगांत सर्व सुखं कोणालाही मिळत नाहींत, अशी जी एक ह्मण आहे ती सर्वस्वी खरी आहे. मी जरी माझ्याच स्थितीविषयीं विचार केला, तरीही हें समजून येणार आहे. माहेरीं व सासरीं न संपे इतकी दौलत आहे. नखांपासून केसांपर्यंत हवे तितके दागिने घालावे, हवं तें चिरगूट नेसावं, हवं तें पक्वान्न करून किंवा करवूनही खावं; याप्रमाणें सर्वोपरीं सुख असतां स्त्री जातीला जें मुख्य सुख, तें माझ्या कपाळीं नाहीं. त्या सुखाची जर इच्छाच झाली, तर चोरून छपून कोणाला न समजतां जाऊन घ्यावं; असा मेला प्रकार. हाच जर माझा पति मोठा असता, तर मला परक्यांच्या तोंडाकडे कां पहावं लागतं ? (महाल शृंगारलेला पाहून) या ठिकाणीं हा लखलखाट करून सगळी व्यवस्था कशी सोईची करून ठेविली आहे. असं असतां (पतीकडे पाहून) या दहा वर्षांच्या पोराशीं प्रसंग ! (कपाळावर हात मारून) या कर्मांत काय लिहिलं आहे तें कळत नाहीं ! (पतीस उद्देशून) दुसरासा जर असता तर किती आनं-

दानं माझी वाट पहात बसला असता ! हरहर ! आतां इथे सगळी रात्र कशी काढावी ? तोंड गोजिरवाणं आहे, पण काय कामाचं ? पहा कसं दीनासारखं भुईवर पडलं आहे. खरं ह्मटलं तर आजच्या पहिल्या प्रसंगीं पतीनं स्त्रीला गोंजारून तोंडावरून हात फिरवून जवळ घ्यावी आणि आपलं प्रेम उघड करून दाखवावं. या गोष्टींचा इथे लेश तरी आहे का ? असो. ज्यापेक्षां चार बायकांनीं मिळून मोठ्या थाटानं खोलींत घातलं आहे, त्यापेक्षां आपणच जवळ घ्यावं आणि काय प्रकार होतो तो पहावा. (असें बोलून पतीस जवळ घेऊन त्याचें चुंबन घेते.)

बाळ्या—(स्त्रीनें चुंबन घेतांच मोठ्यानें बोंब मारून) अरे बाबा चावली ! चावली ! ! चावली ! ! ! चावली. अरे धांवा ! चावली ! अग आई चावली ! ! ! (खोलीं-तील ओरड ऐकतांच बयाबाई व बचंभट येतात.)

बचं०—(हातांतील दांडकें आपटून) अरे धांवा ! चावली ह्मणतो, चावली ! चावली ! !

बया०—(हातांत दिवा घेऊन येते) मुली, अगो मुली, कायग चावलीस ? अरे चावली काय ?

बाळ्या—चावली ! (इकडे तिकडे धांऊन) चावली ! चावली ! ! (बापाच्या गळ्याला मिठी मारून) अरे बाबा चावली रे चावली ! ! बाबा, चावली ! ! !

बया०—बाळ्या, कायरे झालं ? अरे ओरडतोस कां ?

बाळ्या— अग आई चावली ! चावली !! आई चावली !!!

बया०—अरे मेल्या आई चावली काय ?

बचं०—बाळ्या अरे पोरा, पाहूंरे कोठेशी चावली ?

बा०—(गाल दाखवून) हे बघ या इथेचरे चावली ?

बया०—अरे पण चावली कोण ?

बा०—बायको.

बचं०—हा × ढवा, मूर्ख बेटा नाहींतर—अरे ती चावली नव्हे. त्याला मुक्का ह्मणतात ?

बा०—अरे ती कायसें बडबडत येऊन हळूच माझ्या जवळ बसली, आणि मग मला (हाताने दाखवून) असें उचलून घेऊन पट्कन चावली !

बचं०—अगदींच × ढवहा पोर ! अरे बाळ्या, तुला सांगितलें नां ? कीं त्याला मुक्का ह्मणतात.

बाळ्या—हो, हो; आतां समजलोरे बाबा.

बचं०—समजलास नां ? झालें तर जा नीज आतां खोलींत. पुन्हा असा ओरडत उठूं नको.

बा०— अंहंः मी नाहीं आतां तिकडे निजायाला जात. मी आपला आई जवळच निजतों.

बचं०–हा मूर्खा, तुला किती शिकवावें ? (बयाबाईस) आतां हा पोर काय दिवे लावील हें समजलं आहे. तर पुढें काय विचार करितेस ?

बया०–आतां या अपरात्रीं कसला विचार करायाला सांगतां ? आपण जाऊन निजावं; मी त्या पोरीला नीट समजून सांगतें, नी यालाही सगळं शिकवितें. (बाळ्यास) चलरे !

(सर्व निघून जातात.)

प्रवेश ७ वा.

स्थल–बचंभटाचे घराच्या बाजूचा सोपा.

पात्रें–गोविंदबुवा, ठकू आणि बाळ्या.


(गोविंदबुवा आणि ठकू बोलत बसलीं आहेत तों पडदा उघडतो.)

गोविं०–(हंसून) एकून अशी मौज झाली ह्मणतेस. ठीक आहे.

ठकू–ठीक काय आहे ? मला बाई कालपासून लोकांत तोंड दाखवायालाही लाज वाटूं लागली आहे. काय मेलीं तीं माणसें ! सगळा आपला गोंधळ.

गोविं०–मग काय ह्मणतेस तूं ?

(बाहेरच्या बाजूला बाळ्या येऊन उभा राहतो.)


गोविंद बुवा.
ठकू.
बाळ्या.
रवि. पा.

बा०—(बायको गोविंदबुवाजवळ कांहीं बोलत आहे असें जाणून) आतां पहा कशा हंसून हंसून गोष्टी सांगते ती ? नाहीं तर मला आपली चावायालाच धांवते. बरें आतां हीं दोघे काय बोलतात तें ऐकूंया.

गोविंद०—बोल जें तुझ्या मनांत असेल तें सांग पाहूं.

ठकू०—मनांत काय असायचं ? मला कांहीं या घरांत रहावं असं वाटत नाहीं.

बाळ्या—(आडून) × डे गेलीस तर माझं एक खेंटर तुटलें. (पाय आपटतो.)

गोविंद०—या घरांत जर रहावं असं वाटत नाहीं तर चला. पण कदाचित् तुझ्या सासऱ्यानें मजवर आणि तुजवर फिर्याद केली तर ?

ठकू—तो काय मेला फिर्याद करणार ? मी सरकारांत साफ सांगेन की, माझा नवरा खुळा आहे मग कसं होईल ?

गोविं०— ठीक आहे तर. आज रात्रींच निघायाचें. तूं आंगावर दागिने वगैरे पुष्कळसे घालून नीज. शिवाय कांहीं आतांच मजपाशीं आणून दे समजलीस ?

ठकू—तें मला हवं तसं करून ठेवून मी निजेन. मात्र मलाच ओळखून उठवा नाहीं तर होईल घोंटाळा.

गोविं०—त्याची तूं काळजी करूं नको. जा आतां.

ठकू— जाते पण निजून राहूं नका. (जाते.)

बा०— अगो रांडे, आतां तुझा हा सगळा बेत मी बाबाला जाऊन सांगतों. तूं काय समजली आहेस ?

(जातो)

प्रवेश ८ वा.

स्थल—बचंभटाच्या घराची ओसरी.

पात्रें—बचंभट, बाळ्या आणि बयाबाई.

(बचंभट बसले आहेत तों बाळ्या येतो.)

बा०—बाबा तुला एक गम्मत सांगतों रे मोठी ऐकण्या सारखी आहे.

बचं०—काय ह्मणतोस बाळ्या ?

बा०—अरे माझी बायको पळून जाणार आहे.

बचं०— अरे कधीं ? आणि कोणा बरोबर ?

बा०— अरे आजच त्या गोविंदबुवा बरोबर !

बचं०— झालं ? तरीं मी तुला सांगत होतों, कीं कोणी बुवा बिवा आपल्या घरांत कामाचे नाहींत. बरं आहे ह्मणावं बुवाला; (मागें पाहून) अग ए; आहेस कां घरांत ?

बया—(बाहेर येऊन) कां बरं इतकं संतापायला काय झालं ?

बचं०—अग, तो या कार्ट्यानं हट्ट धरून घरांत ढोंगी-बुवा ठेवला आहे तो, तो ह्मणे सुनेला घेऊन आज रात्रीं पळून जाणार-

बया०—हें सांगतं कोण पण ?

बचं०—हा पोरच सांगतो, दुसरं कोण सांगणार ?

बा०— बाबारे जरी ती पळून जाणार आहे, तरी तूं काळजी करूं नको. ती कशी जाते ती मीच पाहीन.

बया०—झालं तर. ज्याच्या बायकोचा अभिमान त्याला असतोच, मग तें कसेंही असो.

बचं०—बरं आहे सर्व. तरी तुला सांगतों असें कर. आज रात्रीं आपलीं सगळ्यांचीं आंथरुणें माजघरांत एकेच ठिकाणीं घाल आपण दोघं तिला मध्यें घेऊन निजूं आणि मग पाहूं कशी जाते ती.

बया०—ठीक आहे, चला आतां, रात्र झाली. जेवावयाचं नाहीं कां ?

(सर्व निघून जातात.)

प्रवेश ९ वा.

स्थल—बचंभटाचें माजघर.

बचंभट, बयाबाई, बाळ्या, ठकू आणि गोविंद-बुवा. (गोविंदबुवा शिवाय सर्व निजलीं असतां पडदा उघडतो.)

गोविंदबुवा—(बाहेरून) या अपरात्रीं दारावर टिचकी मारणें तरी धोक्याचेंच आहे. तरी आपण भीत नाहीं. " लागला तर तीर नाहींतर तुक्का. " तीच उठली तर देव पावला. नाहीं तर जाऊन निजेल, आपल्याला काय ! (हळूच दारावर टिचक्या मारतो.)

ठ०—(पाय न वाजवितां उठून दार उघडते.)

बा०— (आंथरुणावर उठून बसतो.)

गो०— (बाळ्या उठला असें पाहून ठकूस.) अग तो पहा तुझा नवरा उठून बसला आहे.

ठकू—(हळूच) तो जागा असला तरी कांहीं बोलणार नाहीं; तुमच्या जवळ चुन्याची डबी असेल तर द्या इकडे, आणि हें घ्या. (गाठोडें बांधलेलें त्याच्या हवालीं करते.)

गोविं०— (गाठोडें घेऊन चुन्याची डबी देतो) हं, चल नीघ बाहेर.


गोविंद बुवा
ठकू
सासू
सासरा
चि. फा.

ठकू–(सासु सासऱ्याच्या व पतीच्या नाकास चुना लावून बाहेर पडते व गोविंदबुवा बरोबर निघून जाते.)

बाळ्या–(ठकू व गोविंदबुवा बाहेर जातांच दार लावून.) बरी पिडा गेली. जाउंद्या ×डेला गांवा बाहेर. मग बाबाला उठवीन. (असें बोलून बऱ्याच वेळानें आई बापास.) बाबा, अरे बाबा ऊठ. तुला एक गम्मत दाखवितों आणि सांगतों. आई, अग आई, ऊठ आणि दिवा लाव पाहूं. ऊठ ! ऊठ.

बचंभट व बया०–(पोराची हांक ऐकतांच घाबरून " बाळ्या, कायरे आहे " असें ह्मणत उठतात.)

ब०– (दिवालावते.) बाळ्या कायरे आहे ?

बचं०– अरे, घरांत चोरका शिरला आहे?

बा०– अरे शिरला होता. पण मी त्याला घालवून दिला आणि मग तुला उठविलें. ('आरशी दाखवून) बाबा आधीं आपलें तोंड पहा आणि मग मला विचार कायतें.

बचं०– तोंड कसलें पहा ह्मणतोस ? आरशींत पाहून.) अरे माझ्या नाकाला चुना लागला आहे.

बा०– अरे तो माझ्या बायकोनें लाविला आणि त्या बुवाबरोबर निघून गेली हें मी स्वतः पाहिलें.

बचंभट– (कपाळावर हात मारून.) कर्म माझें !

(बाळचास) अरे × ढवा, ती गेली आणि तूं पहात होतास? (थांबून) अथवा तुला तरी कायह्मणून दोष लावूं? बायको ह्मणजे काय? हें जर तुला समजत असतें तर तूं असा वागला नसतास. आह्मींच मूर्ख ह्मणून तुझें लहानपणीं लग्न करून आपली व व्याह्यांची फजिती करून बसलों. धिःकार असो अशा हौशीला! लोकहो हें माझें प्रत्यक्ष उदाहरण पहा आणि सावध व्हा. मुलें वयांत आल्याशिवाय त्यांचीं लग्नें करूं नका. मी पाहिल्या पासून बायकोच्या बुद्धीनें वागल्यामुळें आज पश्चात्तापास पात्र झालों. आमच्या लोकांच्या अशिक्षित स्त्रिया भलतेच हट्ट धरून पतीला एकादें कृत्य करावयास लावतात व सर्वस्वीं नुकसान करून घेतात. यासांठीं कोणी कोणतेंही कृत्य विचारानें व स्वबुद्धीनें दूरवर लक्ष्य देऊन करावें.

(असें बोलून सर्व निघून जातात.)

समाप्त.

व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. १ पासून ६ नगपर्यंत ट० ह० ६ आणे. रोख दाम आल्यास किंवा व्ही० पे० नें पाठवूं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहितीकरितां ०॥- चे तिकीट पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणीसमोर, भायखळा, मुंबई.

विक्रीस तयार.

हास्यरसमालिका.

ह्या मालिकेच्या प्रथमावृत्तीचीं सर्व पुस्तकें संपून तीं फारच मनोरंजक व लोकप्रिय झाल्यामुळें अद्याप पुष्कळ मागणी येतात; ह्मणून पुन्हा तीं पुस्तकें उत्तम टाइपावर छापून मध्यें गमतीच्या देखाव्याचीं चित्रेंही घातलीं आहेत.

	आणे.
पुष्प १ लें—वरणभाताचें प्रहसन अर्थात् विजोड्याचा मनोरंजक फार्स.	४
पुष्प २ रें—धूर्त चातुर्य दर्शन प्रहसन अर्थात् चावट माधवरावाचा मनोरंजक फार्स.	६
पुष्प ३ रें—कुटिलकृत्या दर्शन प्रहसन अर्थात् अनर्थाचा मनोरंजक फार्स.	४
पुष्प ४ थें—सुखीचातुर्य दर्शन प्रहसन अर्थात् गुलाबछकडीचा मनोरंजक फार्स.	६
पुष्प ५ वें—दंपतीकलह प्रहसन अर्थात् बासुंदीचा मनोरंजक फार्स.	४
पुष्प ६ वें—प्रेमबंधन प्रहसन अर्थात् बिलक्षण ढवळाढवळीचा फार्स.	४

हीं पुस्तकें आह्मांकडे विकत मिळतात.

गोविंद मोरोबा काळेकर.